220

Gmail

APCCF Mangrove cell <ccfmmumbai@gmail.com>

# Fwd: कांदळवन तक्रार क्र.२२० , ता. वसई जि. पालघर.pdf

1 message

**Collector Palghar** <collectorpalghar@gmail.com> Fri, Jul 28, 2023 at 12:34 PM
To: ccfmmumumbai@gmail.com, CCF Mangrove cell <ccfmmumbai@gmail.com>

कृपया सोबत जोडलेली फाईल डाऊनलोड करून पहा.

आपला विश्वासू,
गोविंद बोडके (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर
जिल्हा मुख्यालय पालघर,
पालघर- बोईसर रोड, कोळगाव ता. पालघर, जि. पालघर, पिन 401404
कार्या. दूरध्वनी :- 02525 - 253111
*कागद बनविणेसाठी वृक्षतोड केली जाते. झाडे लावा, झाडे वाचवा.*
*कृपया अगदी जरुरी असेल, तरच प्रिंट काढावी .*

---

कांदळवन तक्रार क्र.२२० , ता. वसई जि. पालघर.pdf
2321K

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 1528 दिनांक: 28 JUL 2023
प्रशासकीय अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

Mangrove comm.

## कांदळवन तोड झालेल्या तक्रारीच्या पुर्तता अहवालाचा नमुना -१

**तक्रार क्रमांक :- २२०**

| अ.क्र | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.महेश यशवंत भोईर |
| २ | तक्रारीचा विषय | खारफुटीचा नाश |
| ३ | तक्रारीशी संबंधीत जागेचा तपशिल उदा.स.नं.,गावाचे नाव तालुका | वसई येथिल बारीवाडा मैदानाशेजारी स.क्र.१५३/१/१ या जागेत श्री. शरद विठ्ठल बारी यांनी तीवरांच्या झाडांची कत्तल करुन माती भराव करुन त्यावर सुमारे १५ ते २० अनधिकृत खोल्यांचे बांधकाम केले बाबत |
| ४ | चौकशी करणाऱ्याचे नावे व पदनाम | अध्यक्ष कांदळवन संवर्धन समिती तालुका वसई |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | या जमीनीवरील कांदळवानाचे नुकसान झाले आहे |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | कांदळवनाच्या ऱ्हास झाला आहे. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक दिनांक व संबंधित पोलीस | प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०७/२०२३ रोजी स्थळ पाहणी केली असता, प्रस्तुत जागेवर कांदळवनाची तोड /ऱ्हास झाल्याचे आढळून आलेले नाही. तसचे सदर जागेमध्ये माती भराव व १५ते २० अनधिकृत खोल्याचे बांधकाम केल्याचे दिसून आले नाही. तरी प्रस्तुतची तक्रार आपल्या स्तरावरून निकाली काढणेस विनंती आहे. |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तीचा नावे व पत्ता | निरंक |
| ९ | कोणत्या कायद्यांतर्गत/कलमांतर्गत गुन्हा दाखल केला त्यांचे वर्णन | संधीतावर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

अध्यक्ष कांदळवन संवर्धन समिती
तथा उपविभागीय अधिकारी वसई

अर्जदार :-श्री. महेश यशवंत भोईर
राहणार :- जययश बंगला, बारीवाडा, आगाशी
ता. वसई, जि. पालघर
मो नं. ९८२२३७५९९९

प्रती,

मा. उपविभागीय अधिकारी साहेब

विभाग वसई,

विषय :- **कांदळवन कत्तल बाबत माझी खोटी सही करुन अर्ज केल्याने माझी व शासनाच्या झालेल्या फसवणुकीमुळे गुन्हा दाखल करणेबाबत**

महोदय,

वरील विषयानुसार अर्ज करतो की, मी **श्री. महेश यशवंत भोईर**, वय- ५२ वर्षे, रा. बारीवाडा आगाशी, ता. वसई, जि. पालघर येथील स्थानिक रहिवासी असुन माझा मुळ व्यवसाय शेती आहे. गावातील काही लोकांनी संगनमत करुन माझे विरुध्द् कांदळवनाचा खोटा गुन्हा तलाठी सजा आगाशी यांच्यामार्फत अर्नाळा सागरी पोलिस ठाणे येथे दाखल केला होता. परंतु सदरचा गुन्हा हा खोटा असल्यामुळे मा. न्यायालय वसई यांनी दि. १५/९/२०२१ रोजी माझी निर्दोष मुक्तता केलेली आहे.

सदरचा राग मनात ठेवुन गावातील दोन इसम माझ्या नावाने खोटी सही करून गावातील माझे नातेवाईक शरद बारीया यांच्या विरोधात अनेक कार्यालयात तक्रारी केलेल्या आहेत. सदर तक्रारीबाबत मी वसई विरार शहर महानगरपालिका, अर्नाळा सागरी पोलिस ठाणे यांना माझ्या सहीच्या खोट्या अर्जाबाबत यापुर्वीच ई-मेलद्वारे कळविलेले आहे.

दि. ४/७/२०२३ रोजी आपण स्वत: आपल्याला मिळालेल्या प्राप्त् पत्रानुसार कांदळवनाची पहाणी करण्याकरीता आगाशी येथे गेले होते. सदरचा अर्ज शरद बारीया रा. बारीवाडा, आगाशी यांच्या विरोधात केला असुन अर्जदार मी, महेश यशवंत भोईर असल्याचे मला समजले. त्याबाबत मी काल दि. ५/७/२०२३ रोजी माझ्या इ मेलवरुन आपणास खुलासा कळविलेला आहे. तसेच मी वर नमुद केल्याप्रमाणे आजपर्यंत कोणत्याही कार्यालयात सदर इसमाविरुद्ध कुठलीही तक्रार फोन, ई-मेल किंवा लेखी केलेली नाही. सदरची बाब मी यापुर्वीही आपल्या तसेच सर्व शासकीय कार्यालयास कळविलेले आहे. परंतु आजपर्यंत सदर अर्ज करणारा अज्ञात इसमाविरोधात कुठलीही कारवाई झालेली नाही.

अशा खोट्या अर्जामुळे शासनाची वेळ व आर्थिक नुकसान झालेले आहे. तरी आपण सदर अज्ञात इसमाविरोधात फौजदारी कारवाई करावी हि विनंती.

वसई

दिनांक :- ०६/०७/२०२३

०६/०७/२०२३
लिपीक
उपविभागीय अधिकारी वसई
यांचे कार्यालय

श्री. महेश यशवंत भोईर

07/07/2023, 1:11

# मंडळ अधिकारी आगाशी यांचे कार्यालय

पत्ता- तलाठी कार्यालय आगाशी विरार (प.)

जा.क्र.म.अ.आ/२९/२०२३ दि.०५/०७/२०२३

प्रति,
मा.तहसिलदार साहेब वसई,

विषय:- मौजे आगाशी ता.वसई येथील बारी समाजाच्या मैदानाच्या बाजूला कांदळवन (टीवरीची) कत्तल केल्या बाबत तक्रारी अर्ज,

संदर्भ:-

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषगाने जागेची पहणी करून खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

मौजे आगाशी येथील स.न.हि.न.१५३ या जागे बाबत तक्रारी अर्ज आपले कडे सादर केलेला आहे,सदर स.न.हि.न.ची स्थळपहाणी आज दि.०५/०७/२०२३ रोजी केलो असता अर्जात नमूद केलेला स.न.हि.न.१५३ १ ते ९ हिस्से आहेत टे खाजगी मालकीचे आहेत तसेच वारीवाडा येथील मैदानाची पहाणी केली असता सदर मैदान हे गावठण पैकी क्षेत्र ०.५९.१० एवढे असून या पैकी ०.२६.०० हे.आर क्षेत्र बारी समाजाच्या सार्वजनिक हक्क अशी नोंद ७/१२ च्या इतर हक्क सदरी आहे,सदर मैदानाच्या आजू बाजूला रहिवासी घरे व इमारती आहेत,आजू बाजूला टीवरीची झाडे नाहीत.श्री,महेश भोईर यांना तक्रारी अर्जा बाबत दूरध्वनी वरून विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि,मी कोणत्याही प्रकारचा तक्रारी अर्ज केला नाही असे सांगितले.

मंडळ अधिकारी आगाशी
ता.वसई,जि.पालघर




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner